# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयकुत्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४०९/२०२३ दिनांक – २८/११/२०२३

## वाहन चोरी करणा-या गुन्हेगारांना अटक करुन ४ गुन्हयांची उकल
## गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांची कामगीरी

आचोळे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ४९०/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी श्रीमती निखात जावेद शेख वय ३६ वर्ष रा. ए/३०३, नुर मंजिल बिल्डींग, आचोळे रोड, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर यांनी त्यांची होंडा ॲकटीव्हा ४ जी कंपनीची स्कुटी नं एमएच/०४/जेसी/६५४९ ही त्यांच्या राहत्या बिल्डींगच्या खाली पार्किंगमध्ये उभी करुन ठेवलेली असताना दिनांक १४/१०/२०२३ रोजी पहाटे ०५.०० वाजता ते ०५.३० वाजताच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली असल्याबाबतची फिर्याद दिल्यावरुन दिनांक १५/१०/२०२३रोजी १७.१३ वाजता सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये सतत होणा-या वाहन चोरींचे प्रमाण वाढत असल्याने सदर वाहन चोरींवर आळा घालणेबाबत मा. वरीष्ठांनी ओदशित केले होते. त्या अनुषंगाने घडणा-या प्रत्येक वाहन चोरीचे गुन्हयाचे ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून सदर घटनास्थळ व आजुबाजुचा परीसरामध्ये नमुद वाहन चोरीतील वाहन चोरुन नेणा-या आरोपीताचा सी सी टी व्ही फुटेजच्या परीक्षणाव्दारे शोध गुन्हे शाखा कक्ष -२ वसई यांचे मार्फतीने घेण्यात येत होता. त्यानुसार गुप्त बातमीदाराकरवी आचोळे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ४९०/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे या वाहन चोरीच्या गुन्हयांतील आरोपीताचे नावाची उकल करुन आरोपीत महोम्मद गुलाब ईब्राहीम मन्सुरी वय २३ वर्ष धंदा- मोटार सायकल गॅरेज दुकान रा. गणेश वेल्फेअर सोसायटी,हीताची ए टी एम मशिनचे मागे, भोईदापाडा, वसई पुर्व यास सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले असुन त्याचा सदरच्या गुन्हामध्ये सहभाग निष्पन्न झाला आहे. आरोपीत याचेकडे केलेल्या तपासादरम्यान त्याचेकडुन वाहन चोरी व मोबाईल चोरीचे असे एकुण ४ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**-: आरोपीत याचे कडुन उघड झालेले गुन्हे :-**

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गु.रजी नं. |
|---|---|---|
| १ | वालीव पोलीस ठाणे | ३६२/२०२३ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| २ | आचोळे पोलीस ठाणे | ४१५/२०२३ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ३ | आचोळे पोलीस ठाणे | ४९०/२०२३ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ४ | आचोळे पोलीस ठाणे | ४८४/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कारवाई मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. रविंद्र पवार, प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.हवा. अमोल कोरे, म.सु.ब.रामेश्वर केकान यांनी केली आहे.




**----0000----**